Impact Factor – 3.452

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2017

SPECIAL ISSUE-XV

## २००० नंतरच्या साहित्यातील समाजचित्रण




Guest Editor -
Dr. P. V. Rasal
Coordinator-Dean - Mental Moral and Social Sciences,
Savitribai Phule Pune University, Pune [M.S.] India
Principal - KGDM Arts, Commerce & Science College,
Niphad, Dist – Nashik [M.S.] INDIA

Chief Editor –
Prof. Dhanraj Dhangar
Asst. Prof.(Deptt. of Marathi)
M.G.V.'S Arts & Commerce College,
Yela, Dist – Nashik
[M.S.] INDIA

Executive Editor : Prof. Smt. Sunita Uphade (Niphad),
Associate Editors : Prof. Madhav Khalkar & Prof. R. D. Shinde (Niphad)



This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

RESEARCH JOURNEY

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
February 2017

Karmaveer Kakasaheb Wagh Arts, Commerce, Science and Computer Science College, CHANDORI, Tal. Niphad, Dist. Nashik 422 201

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2017

SPECIAL ISSUE-XV

## २००० नंतरच्या साहित्यातील समाजचित्रण

Guest Editor -
Dr. P. V. Rasal
Coordinator-Dean - Mental Moral and Social Sciences,
Savitribai Phule Pune University, Pune [M.S.] India
Principal - KGDM Arts, Commerce & Science College,
Niphad, Dist – Nashik [M.S.] INDIA

Chief Editor –
Prof. Dhanraj Dhangar
Asst. Prof.(Deptt. of Marathi)
M.G.V.'S Arts & Commerce College,
Yela, Dist – Nashik
[M.S.] INDIA

Executive Editor : Prof. Smt. Sunita Uphade (Niphad),
Associate Editors : Prof. Madhav Khalkar & Prof. R. D. Shinde (Niphad)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 225/-



Scanned by CamScanner

ISSN : 2348-7143
February 2017

## Editorial Board

**Guest Editor -**
**Dr. P. V. Rasal**
Coordinator-Dean - Mental Moral and Social Sciences, Savitribai Phule Pune University, Pune [M.S.] India
Principal - KGDM Arts, Commerce & Science College, Niphad, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Chief Editor –**
**Prof. Dhanraj Dhangar**
Asst. Prof.(Deptt. of Marathi)
M.G.V.'S Arts & Commerce College, Yela, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor : Prof. Smt. Sunita Uphade (Niphad),**
**Associate Editors : Prof. Madhav Khalkar & Prof. R. D. Shinde (Niphad)**

### Co-Editors -
- **Mr.Tufail Ahmed Shaikh-** King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom** of **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Dr. Sharad Birhade** - D. N. College, Faizpur.
- **Prof. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.

### Advisory Board -
- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare -** Director, School of Languages Studies, N. M. University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** – Rtd. Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib.Sci., Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

### Review Committee -
- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. K. Wadekar** – M. S. G.College, Malegaon Camp, Dist- Nashik

### Published by -
- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) -0.676 (2013)
Special Issue 15 : २००० नंतरच्या साहित्यातील समाजचित्रण
ISSN : 2348-7143
February 2017

## अनुक्रमणिका


| अ. नं. | शोधनिबंधाचे शीर्षक - लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय - - प्रा. श्रीमती सुनीता उफाडे | ०४ |
| २ | मराठी विज्ञान कादंबरीतील सामाजिकता -डॉ. पौर्णिमा बोडके | ०५ |
| ३ | २००० नंतरचे मराठी साहित्य आणि समाज - प्रा. डॉ. भाऊसाहेब वि. गमे | ०८ |
| ४ | २००० नंतरच्या नागरी जाणिवांचा रोखठोक आविष्कार 'शहर आत्महत्या करायच म्हणतंय' -डॉ. राहूल पाटील | १२ |
| ५ | 'भिन्न' (२००७) कादंबरीतील भाषाशैली -डॉ. किरण पिंगळे | २० |
| ६ | ग्रामीण कथेतील बदलते समाजजीवन -डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर | २४ |
| ७ | आसाराम लोमटेच्या कथेतील सामाजिक प्रश्न आणि वर्तमानातील बदलते संदर्भ - डॉ. अशोक देशमाने व डॉ. मनोज मुनेश्वर | २७ |
| ८ | २००० नंतरची मराठी कविता : एक वेध - प्रा. महेश बनकर | ३१ |
| ९ | २००० नंतरच्या मराठी कादंबरीतील सामाजिक स्थित्यंतरे - प्रा. कैलास सलादे | ३४ |
| १० | २००० नंतरचे मानवी व कृषिजीवनातील स्थित्यंतरे - प्रा. अशोक भवर | ३७ |
| ११ | २००० नंतरचे मराठी साहित्य - प्रा. शिवाजी सुंभे | ४१ |
| १२ | २००० नंतरचे मराठी साहित्यातील एक प्रवाह -भाषांतरीत साहित्य - प्रा. देविदास शिंदे | ४४ |
| १३ | २००० नंतरच्या स्त्री साहित्याचे सामाजिकीकरण - प्रा. माधुरी गवळी | ४७ |
| १४ | तेंडुलकरांच्या नाटकांचा २००० सालानंतरच्या नाटकांवर होणारा प्रभाव - श्रीमती विजया पाटील | ५० |
| १५ | २००० नंतरच्या चरित्र व आत्मचरित्राचे स्वरुप - श्रीमती मंजुषा सोनार | ५३ |
| १६ | समकालीन कवयित्रींच्या कवितांतील स्त्री समस्यांचे चित्रण - प्रा. अरूण ठोके | ५६ |
| १७ | २००० नंतरच्या स्त्री साहित्यातील समाज चित्रण -प्रा. श्रीमती सुनीता उफाडे | ५९ |
| १८ | २००० नंतरच्या मराठी साहित्यातील पर्यावरण चित्रण -प्रा. आर. डी. शिंदे. | ६२ |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

- कार्यकारी संपादक



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 15 : २००० नंतरच्या साहित्यातील समाजचित्रण
ISSN : 2348-7143
February 2017

# समकालीन कवयित्रींच्या कवितांतील स्त्री समस्यांचे चित्रण

अरूण शिवाजी ठोके
सहाय्यक प्राध्यापक
के.के.वाघकला, वाणिज्य, विज्ञान व संगणक विज्ञान
महाविद्यालय,चांदोरी.निफाड ,जि. नाशिक

समकालीन मराठी कवितांचा अभ्यास केला असता स्त्री कवयत्रिंची कविता आणि पुरूष कवींची कविता अशी विभागणी स्त्रीवादी दृष्टिकोनातून शक्य आहे. इथे स्त्रीयांच्या समस्या स्त्रीयांच्या कवितांतून कसा काव्यानूभव म्हणून येतात, हे पहाणे उद्बोधक ठरेल.भारतीय पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला सोशिकवृत्तीची, आदर्शपत्नी, आई, बहीण, पुरूषाच्या अपेक्षेनुरूप प्रेम करणारी प्रेयसी अशा प्रतिमेतून पाहिले जाते. समर्पण वृत्ती हा तिचा स्थायीभाव आहे असे गृहीत धरणारी आशयसूत्रे पुरूष कवींच्या कवितांतील स्त्रीकडे पाहण्याचा पारंपरिक दृष्टीकोन दर्शवितात. याला काही अपवाद आहेतही. याउलट स्त्रीला तिचे स्वातंत्र व्यक्तिमत्त्व आहे. तिचे सुख–दु:ख व्यक्त करण्यासाठी अभिव्यक्तीचे, समाजात वावरण्याचे, निवडीचे, भाषेचे, कलेचे स्वातंत्र्य आहे. तिच्यावर होणा–या अन्यायाविरूध्द प्रसंगी ती व्यवस्थेविरूध्दही आपला एल्गार पुकारू शकते. यावर तिचा विश्वास आहे. सर्व प्रकारच्या पुरूषी दमन व्यवस्थेचा ती धिक्कार करते. प्रसंगी समाजाच्या तिच्याविषयी असलेल्या सर्व धारणा, तत्त्वे, मुल्ये यांची ती वि–रचना करते. त्यासाठी कविता हे अभिव्यक्तीचे नेटके माध्यम असल्याचे भान समकालीन कवयित्रींना आहे.

स्त्री जीवनाला केंद्रस्थानी मानुन कविता लिहीणा–या समकालीन कवयित्रींत नीरजा, प्रज्ञा लोखंडे,ज्योती लांजेवार,आसावरी काकडे, अश्विनी गुरव, अंजली कीर्तने, कविता महाजन, सुमती लांडे, शैला सायनकर, विदुलारमाबाई, मिनाक्षी पाटील, संजिवनी तडेगावकर अशा अनेक कवयित्री आहेत. यापैकी काही कवयित्रींच्या निवडक कवितांतून स्त्री समस्यांचे चित्रण कसे करण्यात आलेले आहे हे थोडक्यात पाहू.

वैवाहिक जीवनातील सुखाबरोबरच आपल्या वाट्याला आलेल्या दुखांमागे पुरूषी शक्ती आहे. आपले अस्तित्व घडवू न शकल्याचे शल्य यामूळे भांबावलेले, घाबरलेले एकाकी स्त्रीमन कविता महाजनांच्या कवितांतून भेटते. 'मालक' या शब्दाची अनेक रचनांतून योजना करत स्त्रीच्या गुलामीचे, तिच्या परावलंबिततेचे अनेक संदर्भ नेटकेपणाने येतात. पतीकडुन लादल्या गेलेल्या कठोर बंधनांची त्याच्या अन्याय पूर्णवागण्याची रीत उपहासातून व्यक्त होते. स्त्रीच्या आजवरचित्रित न झालेल्या अनेक हळव्याव्यथांचे कंगोरे, अपारंपरिक अत्मानुभावाचे उन्नत व उत्कटसर्जक आविष्कार महाजनांच्या कवितांतून प्रकट झालेले आहेत. त्या आपल्या मनातील भावनांचा, विचारांचा धीट आविष्कार अशा प्रकार करंतात–

> "स्त्रीत्वाच्या दातांमध्ये आपली जीभ अडकून राहील,
> हे ध्यानातच नव्हतं आलं; अन्यथा
> कधी तरी पुरूषांविषयी सगळं बोलायचंहोत."

पुरूषांकडून स्त्रीयांच होणारे दमन थांबले पाहिजे. त्यासाठी आपल्या दु:खद अनुभवांची मांडणी काव्यातून केली पाहिजे. या भूमिकेतून अनेक कवयित्रींनी स्त्रीयांच्या समस्यांना वाचा फोडली. स्त्रीला नेहमीच जाचक अशा रूढींनी बध्द करून ठेवण्यात आले. वेगवेगळया प्रकारची बंधने हेतूपूर्वक तयार करून तिला घराच्या



Scanned by CamScanner

चौकटीतच बंदिस्त करून तिच्या स्वतंत्र अस्तित्वाला नाकारून तिचे मत, भावना, विचार, निर्णय गृहीत धरण्यात येतात ही जाणीव रजनी परूळेकरांनी व्यक्त केली आहे. आपल्या कुटुंबात, आपल्या गोतावळयात स्त्रीला परावलंबी बनविल गेले की ती केवळ अशा बंधनांत सुरक्षित राहू शकते ही गोष्ट तिच्या मनावर बिंबवली जाते मात्र स्त्री म्हणून आपण स्वत:ला जे सुरक्षित मानतो ते किती कुचकामी आहे हे सांगताना सुमती लांड म्हणतात–

"आपण समजत असतो
चौकटीत आपण ठाम सुरक्षित
पायघोळ झग्याच्या आत
दडवतो निरूप जखमा"

अनेक स्त्रीयांचे बालपणीच कुटुंबातील सदस्यांकडून किंवा रक्ताच्या नात्यातील पुरूषांकडून लैंगिक शोषण झाले असल्याचे संदर्भ व आकडेवारी वेगवेगळया अहवालांतून पुढे आलेली आहे.

ज्या स्त्रीला स्वातंत्र्याचे महत्वं कळाले, बालपणापासून मुक्त वातावरणात स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याची क्षमता तिच्याकडे होती तिला विवाहानंतर अनेक तडजोडी कराव्या लागतात. तिचे स्वातंत्र्य जोडीदाराला पटत नाही. उच्चशिक्षित होऊनही तिच्या विचार–भावनांना दुय्यम लेखले जात किंबहुना अयोग्य वाटत असेल, बुध्दीला पटत नसेल तरी पतीने सांगितल्या प्रमाणेच तिने वागावे असे वास्तव संगीता बर्वे यांच्या कवितेतून व्यक्त होते–

"स्वातंत्र्याचं बाळकडू तेच आता पचायला जड जातंय
चार भिंतीत माझं अस्तित्व
हमसून रडतंय
मी उच्चशिक्षित, तू अशिक्षित
पण शेवटी सारख्याच ठरलो"

RESEARCH JOURNEY

अशिक्षित आणि उच्चशिक्षित अशा दोनही प्रकारच्या स्त्रीयांच्या वाटयाला सारखाच दु:खानुभव येतो. दोघींच्याही अस्तित्वाला चारभिंती बंदिस्त करून टाकतात ही जाणीव स्त्रीयांच्या समकालीन सामाजिक स्थानातील विदारकता स्पष्ट करते. अशी स्थिती असल्याचे वरील अनुभवातून स्पष्ट होते.

स्त्रीचे वेगळेपण, तिचे अस्तित्वं म्हणज तिचे 'बाईपण' जसे आकाराला यायला हवे तसे येत नाही. ती स्वत:ला घडवून स्वत:चा चेहरा शोधण्याचा प्रयत्न करते आहे परंतु बहुसंख्येने जर पाहिले तर तिची स्थिती कशी आहे हे सांगताना प्रज्ञा लोखंडे म्हणतात–

"बाई शोधते तिचा हरवलेला चेहरा
बाई शोधते तिचं हरवलेल शरीर
बाई शोधते तिची सावली
बाई शतकानुशतकं
चौकोनी गुहेचं माप ओलांडते"

हा शोध अपुराच राहून जातो. तिच्या शोधमार्गात अनेक अडथळे उभे केले जातात. तिला रोखण्यात पुरूषप्रधान व्यवस्था यशस्वी ठरते. सगळ्या तडजोडी बाईनेच कराव्यात.तडजोड पुरूषानेच केली तर असा अनुभव व्यक्त होतो–



Scanned by CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 15 : २००० नंतरच्या साहित्यातील समाजचित्रण
ISSN : 2348-7143
February 2017

"तडजोड म्हणजे तडकणं पुरूषाचं
आणि सांधे जोडबाईची
आयुष्याचे वस्त्र फाडफाडून
संसाराला ठिगळ लावण्याची"

संसाराचा अधिकाधिक भार स्त्रीवर टाकुन पुरूष मुक्तपणे जीवन जगू शकतो. सामाजिक धारणाही स्त्रीला दडपून टाकण्यासाठी पूरक ठरतात. अशा शोषक अन्यायी व्यवस्थेविरूध्द लढाऊ वृत्तीची स्पष्ट भूमिका घेणे अपरिहार्य असल्याची जाणीव मल्लिका अमरशेख, कविता महाजन, प्रज्ञा लोखंडे, नीरजा यासारख्या कवयित्रींच्या कवितांतून प्रकट होते. हजारो वर्षांपासून स्थापीत झालेल्या गुलामीच्या

व्यवस्थेचे खरे रूप पुढे आणण`सुरू झालेले आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून स्त्रीला गुलाम करण्याची नवनवीन तंत्रे शोधुन पुरूषांनी शोषणाची अभिनव पध्दत अवलंबल्याचे भान नीरजा यांच्या कवितेतून असे प्रकट होते–

" हा जागतिकीकरणा चारेटा
एक प्रकारचा
बाया करताहेत
जगण्याच्या सा–याच फाईल्स
अपटुडेट
बाप्ये शोधता तरोजन वाव्हायरस
बायांच्या फाईल्समध्ये सोडण्यासाठी
बायांना आता करावी लागेल
त्यांच्या जगण्याची चौकट
व्हायरस फ्री.
आणि जमलंचतर
बदलूनही टाकावी लागेल
हार्डडिस्क
बाप्यांनी तयार केलेली त्यांच्यासाठी."

ही कविता समकालीन जीवन वास्तवाबरोबरच समकालीन कवयित्रींच्या काव्य लेखना मागील प्रयोजन ही स्पष्ट करते. या कवयित्रींनी स्त्री –पुरूष विषमता नष्ट करण्याचा संकल्प केलेला दिसतो. बाजारपेठीय वृत्तीला बढावा देणा–या नवभांडवलशाहीचा पुरूषसत्ता कव्यवस्थेला अनुकूल उपयोग करून घेण्याच्या कारस्थानाला जोरदार विरोध करणे ही नवप्रवृत्ती हा या कवितेचा विशेष होय. थोडक्यात–हजारो वर्षापासुन तयार करण्यात आलेल्या पुरूषप्रधान व्यवस्थेच्या चक्रव्युहातून बाहेर पडुन आपल्या अस्तित्वाचा, स्वातंत्र्याच्या शक्यतांचा शोध घेणे, प्रसंगी संघर्ष करून व्यवस्था हाताळण्यांसाठी पुढे येण्याची आवश्यकता असल्याची दृष्टी समकालीन कवितांतून प्रकट होते.

---------------



Scanned by CamScanner